# प्रेसनोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : २२/०५/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | १) श्री. महेश मुरलीधर दुपारे, वय ३८ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद विदयुत अभियंता (वर्ग ३), नगर परिषद, वरूड, ता. वरूड, जि. अमरावती, राह. इंदिरा गांधी नगर, विनाके लेआउट, प्लॉट नं. २८, नागपुर.<br>२) श्री. शरद ज्ञानेश्वर बेलसरे, वय ४४ वर्षे, व्यवसाय कंत्राटी इलेक्ट्रीशन, नगर परिषद, वरूड, ता. वरूड, जि. अमरावती, राह. संभा पेठ, राजुरा नाका, घर नं. १४२, वरूड, ता. वरूड, जि. अमरावती |
| ३ | अपराध घडला दिनांक व वेळ | दिनांक २२/०५/२०२५ रोजी १३.०७ ते १३.५३ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | २,५०,०००/—रुपये |
| ५ | तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | १,५०,०००/— रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | १,५०,०००/—रुपये |
| ७ | घटनास्थळ | तक्रारदार यांचे सक्षम इलेक्ट्रीकल्स चे कार्यालयामध्ये |

**थोडक्यात हकिगत** :— यातील तक्रारदार हे इलेक्ट्रीकल कॉन्ट्रक्टर असुन त्यांचेकडे एम.एस.ई.डी.सी.एल.चे काम करण्याचे लायसन्स आहे. वरूड नगर परिषदेमध्ये नवीन रस्त्यांचे कामे चालु असुन त्या रस्त्याचे कामात अडथळा येणारे इलेक्ट्रीक पोल्स व डि.पी. हटविण्याचे कामाचे कॉन्ट्रक्ट तक्रारदार यांना मिळाले आहे. त्याप्रमाणे त्यांची वरूडमध्ये चौधरी मंगल कार्यालय ते पार्डी रोड तसेच शासकिय विश्रामगृह ते मटन मार्केट अशी दोन कामे चालु असुन त्यातील झालेल्या कामाचे ३,००,०००/—रू व २,५०,०००/—रू. कामाचे बिल त्यांनी नगर परिषद, वरूड येथे सादर केले होते. सदरचे कामाचे मोजमाप पुस्तिका मंजुर करून कामाचे बिल मंजुरीकरीता लेखा शाखेत पाठविणेकरीता यातील आलोसे श्री. महेश मुरलीधर दुपारे, वय ३८ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद विदयुत अभियंता (वर्ग ३), नगर परिषद, वरूड, ता. वरूड, जि. अमरावती, यांनी तक्रारदार यांचेकडे एकुण बिल रक्कमेचे ३५ टक्के लाच रक्कमेची मागणी केलेबाबत तक्रारदार यांनी दिनांक १९/०५/२०२५ रोजी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक २०/०५/२०२५ रोजीचे शासकिय पंचासमक्ष पडताळणीमध्ये आलोसे महेश मुरलीधर दुपारे यांनी वरील नमुद बिलांचे कामाचे मोजमाप पुस्तिका मंजुर करून कामाचे बिल मंजुरीकरीता लेखा शाखेत पाठविणेकरीता २,५०,०००/—रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती १,५०,०००/—रू. लाच रक्कम स्विकारण्याची समंती दर्शविली.

दिनांक २२/०५/२०२५ रोजी शासकिय पंचासमक्ष आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे श्री. महेश मुरलीधर दुपारे यांनी लाच रक्कम खाजगी इसम श्री. शरद ज्ञानेश्वर बेलसरे, यांना स्विकारण्यास सांगितली. त्याप्रमाणे खाजगी इसम श्री. शरद ज्ञानेश्वर बेलसरे यांनी १,५०,०००/—रू. लाच रक्कम तक्रारदार यांचे समक्ष इलेक्ट्रीकल्स यांचे कार्यालयात स्विकारताना त्यांना ताब्यात घेतले, त्याच वेळेला दुसऱ्या पथकाने आलोसे श्री. महेश मुरलीधर दुपारे यांना ताब्यात घेतले आहे. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे. वरूड, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा. श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री. अभय आष्टेकर, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पो.नि. भारत जाधव, तसेच पो.नि. केतन मांजरे, पोलीस अमंलदार उपेंद्र थोरात, वैभव जायले, शैलेश कडु व चालक पोहवा राजेश बहिरट यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाचप्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क : अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती**
**ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५,टोल फ्रि नंबर—१०६४**

B Jadhav 22/05/25

**भारत एकनाथ जाधव**
**पोलीस निरीक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती.**